<u>नियमित दिवाणी मुकदमा नं. ९/२०१६ मधील</u>

<u>निशाणी ४८ वरील आदेश</u>

**(तुळशीदास खोबरेकर वि. महेश वाडयेकर व.५)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मयत वादी तुळशीदास मुकुंद खोबरेकर यांचे वारसांना वादी म्हणून सामील करुन घेणेकरिता केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या मते सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील मुळ वादी तुळशीदास मुकुंद खोबरेकर हे दिनांक ०४/०७/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. मयत वादीचे वादी क्र.१'अ' श्री. नरेंद्र तुळशीदास खोबरेकर, वादी क्र.१'ब' श्री. उमेश तुळशीदास खोबरेकर, वादी क्र.१'क' सौ. जस्मीन हरेश खवणेकर, पूर्वाश्रमीची गिता तुळशीदास खोबरेकर हेच नजीकचे व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याचे कामी मयत वादी तुळशीदास मुकुंद खोबरेकर यांचे वारस म्हणून सामील करुन तशी दुरुस्ती करणेची परवानगी अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी ४९ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे कथनाप्रमाणे प्रस्तुतचा अर्जदार यांचा अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. अर्जदार यांना प्रस्तुत दाव्याविषयी माहिती असून देखील त्यांनी दाव्यास विलंब व्हावा या हेतूने मुदतीत मयत मुळ वादीचे वारस अभिलेखावर आणलेले नाहीत. सबब, वादी यांच्या वारसांनी दिलेला अर्ज कायदेशीर नाही तरी तो फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकतीमध्ये हक्कप्रस्थापना होवून प्रतिवादीविरुध्द कायमची ताकीद होणेकरिता दाखल केलेला

आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार यांनी निशाणी ४५ सोबत मयत वादी तुळशीदास मुकुंद खोबरेकर यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी तसेच नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे मयत वादी तुळशीदास मुकुंद खोबरेकर यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, अर्जदार यांचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येतो. |
| २. | अर्जदार यांना सरनाम्यामध्ये निशाणी क्र.४८ वरील अर्जाप्रमाणे दुरुस्ती करणेची परवानगी देण्यात येते. |
| ३. | अर्जदार यांनी सदर आदेशाप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेची आहे व दाव्याची दुरुस्त प्रत पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी. |

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.10.13 19:31:08 +0530

दिनांकः –१०/१०/२०२५.　　　　(श्रीम. आर.जी.कुंभार)

ठिकाणः– कुडाळ　　　　अति.सह दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर), कुडाळ.